**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा चिटणीस,**
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०१/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५/०२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८/०३/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/०५/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी** :- दिनांक २/१२/२००७ रोजी 'तलाठी' या पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेच्या संदर्भातील एकूण ९ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. मल्लिकार्जुन सिद्राम मोरडे हे अनुपस्थित होते. त्यामुळे दि.१५/०४/२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली.सुनावणीस उभय पक्ष उपस्थित नव्हते. 'अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती तलाठी परीक्षेस

बसलेल्या एकूण १७१२२ परीक्षार्थींच्या अर्जावरुन संकलित करुन, महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास देण्याची भूमिका होती. तथापि महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही संकलित केलेली नसल्याने, तसेच त्यासाठी शासनाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागणार असल्याने अर्जदारास माहिती देणे शक्य झाले नाही', असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती संगीता चौगुले यांनी प्रपत्रात नमूद केले आहे हे प्रतिपादन रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,** महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ **यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. लतेंद्र ज.भिंगारे
३३२, मंगळवार पेठ, भिमनगर, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा क्रीडा अधिकारी,
पुणे, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११११२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २.२.२०१० |

५ **उपस्थित**

**अपीलकर्ता** : श्री. लतेंद्र ज.भिंगारे
३३२, मंगळवार पेठ, भिमनगर, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे
ब्लॉक नं.१८, नेहरु स्टेडियम, पुणे श्री. आनंद व्यंकेश्वर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा क्रीडा अधिकारी,
पुणे, जि. पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. एस. व्ही. झिंजुरके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. २.२.२०१० रोजी आयोगापुढे सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांनी विहित मुदतीत व पूर्ण माहिती दिली नाही. अर्ज सुस्पष्ट असताना संदिग्ध असल्याचे सांगून वेळ काढला व उपलब्ध होईल तशी माहिती देण्यात येईल, असे सांगितले. अर्जातील मुद्दा क्र.७ ची माहिती अद्यापही मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. लतेंद्र जनार्दन भिंगारे यांनी केली.

श्री. भिंगारे यांनी संस्थेचे नाव नमूद न करता ढोबळ मानाने विचारणा केली होती. त्यामुळे स्पष्टीकरणासाठी त्यांना समक्ष बोलावून चर्चा केली. दरम्यानच्या काळात त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग यांच्याकडे अपील केले. माहिती त्वरित देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग यांनी दिल्यानंतर सात वर्षांतील माहिती वर्षनिहाय दिली. २४९ पानांची ही माहिती अपीलकर्ता यांनी दि. ४.१०.२००७ रोजी समक्ष घेतली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एस.व्ही. झिंजुरके यांनी केले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग यांनी घेतलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. आमदार निधी व अनुदान याबाबत अपीलकर्त्याच्या अर्जात स्पष्टता नव्हती, असे प्रतिपादन विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री. आनंद व्यंकेश्वर यांनी केले.

श्री. भिंगारे यांचा अर्ज दि.२४.५.२००७ चा आहे. आपण त्यांना अर्जातील माहितीबाबत चर्चेसाठी दि.२१ व २२.६.२००७ रोजी बोलावले व मुद्दयांबाबत स्पष्टीकरणाची विचारणा केली. दि. २१.८.२००७ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी ते अनुपस्थित होते व नंतर कार्यालयात येऊन दि. ४.१०.२००७ रोजी त्यांनी माहिती समक्ष स्वीकारली, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीड अधिकारी, पुणे श्री. अनिल चोरमले यांनी दि. १७.७.२००८ च्या 'विशेष अपील

निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग श्री. नरेंद्र सोपल यांनी आयोगाच्या विचारणेनंतर दि. ११.१२.२००७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालात पुढील बाबी नमूद केल्या आहेत /-

१. श्री. भिंगारे यांचे अपील दि. ११.७.२००७ रोजी प्राप्त झाले.

२. दि. १६.७.२००७ रोजी श्री. चोरमले यांना माहिती बाबत पत्र पाठविण्यात आले.

३. दि. २१.७.२००७ रोजी भ्रमणध्वनीवरुन त्यांचेशी संपर्क साधून माहिती आपल्याकडे त्वरित देण्याबाबत सूचना दिल्या. तरीही श्री. चोरमले यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने दि.३१.७.२००७ रोजी स्मरणपत्र देण्यात आले.

४. श्री. चोरमले यांच्याकडून दि.१४.८.२००७ रोजी उप संचालक कार्यालयाकडे माहिती प्राप्त झाली. दि. २१.८.२००७ रोजी अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. माहिती स्वतः स्वीकारण्याबाबत श्री. भिंगारे यांना आपल्या कार्यालयातर्फे दि. २२.८.२००७ च्या पत्रान्वये कळविले. दि. ४.१०.२००७ रोजी त्यांनी माहिती समक्ष घेतली.

वरील बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे श्री. अनिल चोरमले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसारची कार्यवाही विहित मुदतीत केलेली नाही. अर्जातील संदिग्धेबाबत अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांची मुदत संपण्याच्या सुमारास त्यांनी अपीलकर्त्याशी चर्चा केली. हेच ते आधी करू शकले असते. या चर्चेनंतरही व अपिलीय प्राधिकारी तथा तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग यांनी सूचना व स्मरणपत्र देऊनही दि. १४.८.२००७ रोजी - म्हणजे विहित मुदत संपल्यानंतर ५९ दिवसांनी त्यांना माहिती दिली. या विलंबाबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

मुद्दा क्रमांक ६ व ७ बाबत संदिग्धता असल्याचे आयोगापुढील सुनावणीत सांगितले जाते, ही बाब योग्य नाही. या मुद्दयांमध्ये आमदार स्थानिक विकास निधीतील माहितीच अपेक्षित असल्याचे श्री. भिंगारे यांनी आधीच स्पष्ट केले असून ती तीन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ४.२.२०१० रोजी पूर्तता करण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे श्री. अनिल चोरमले यांनी आयोगास अवगत केले.

निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग श्री. नरेंद्र सोपल यांनी आयोगाच्या विचारणेनंतर दि. ११.१२.२००७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालात पुढील बाबी नमूद केल्या आहेत /-

१. श्री. भिंगारे यांचे अपील दि. ११.७.२००७ रोजी प्राप्त झाले.

२. दि. १६.७.२००७ रोजी श्री. चोरमले यांना माहिती बाबत पत्र पाठविण्यात आले.

३. दि. २१.७.२००७ रोजी भ्रमणध्वनीवरुन त्यांचेशी संपर्क साधून माहिती आपल्याकडे त्वरित देण्याबाबत सूचना दिल्या. तरीही श्री. चोरमले यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने दि.३१.७.२००७ रोजी स्मरणपत्र देण्यात आले.

४. श्री. चोरमले यांच्याकडून दि.१४.८.२००७ रोजी उप संचालक कार्यालयाकडे माहिती प्राप्त झाली. दि. २१.८.२००७ रोजी अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. माहिती स्वत: स्वीकारण्याबाबत श्री. भिंगारे यांना आपल्या कार्यालयातर्फे दि. २२.८.२००७ च्या पत्रान्वये कळविले. दि. ४.१०.२००७ रोजी त्यांनी माहिती समक्ष घेतली.

वरील बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे श्री. अनिल चोरमले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसारची कार्यवाही विहित मुदतीत केलेली नाही. अर्जातील संदिग्धेबाबत अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांची मुदत संपण्याच्या सुमारास त्यांनी अपीलकर्त्याशी चर्चा केली. हेच ते आधी करू शकले असते. या चर्चेनंतरही व अपिलीय प्राधिकारी तथा तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग यांनी सूचना व स्मरणपत्र देऊनही दि. १४.८.२००७ रोजी - म्हणजे विहित मुदत संपल्यानंतर ५९ दिवसांनी त्यांना माहिती दिली. या विलंबाबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

मुद्दा क्रमांक ६ व ७ बाबत संदिग्धता असल्याचे आयोगापुढील सुनावणीत सांगितले जाते, ही बाब योग्य नाही. या मुद्दयांमध्ये आमदार स्थानिक विकास निधीतील माहितीच अपेक्षित असल्याचे श्री. भिंगारे यांनी आधीच स्पष्ट केले असून ती तीन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ४.२.२०१० रोजी पूर्तता करण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे श्री. अनिल चोरमले यांनी आयोगास अवगत केले.

निविदा प्रसिध्द का केली नाही, अशा स्वरुपाची अपीलकर्त्यांची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार 'माहिती' ठरत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे श्री. अनिल चोरमले यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल ते शास्तीस पात्र आहेत. त्यांना ५९ दिवसांसाठी (५९ x २५० = १४,७५०/- ) एकूण रु. १४,७५०/- एवढी शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती मे व जून २०१० या महिन्यांच्या व जून व जुलै २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून दोन समान हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, यांनी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर नामदेव कड
मु.पो. चाकण, विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, खेड, जि.पुणे-४१० ५०१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी बु.
ता.खेड, जि.पुणे-४१० ५०१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता**-श्री शंकर नामदेव कड<br>मु.पो. चाकण, विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, खेड, जि.पुणे-४१० ५०१ श्री.के.बी.नेहरे<br><br>**जन माहिती अधिकारी** ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी बु.<br>ता.खेड, जि.पुणे-४१० ५०१ श्री.एस.बी.कड | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०९.०२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.०४.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गावातील स्मशानभूमीचे बांधकाम बेकायदेशीर असल्यामुळे अतिक्रमणाबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी बु.,ता.खेड, जि.पुणे यांनी विहित मुदतीत व योग्य दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शंकर नामदेव कड यांनी केली.

श्री.कड यांचा अर्ज दि.०९.०२.२००७ चा असून विहित मुदतीत देऊ केलेली माहिती त्यांनी वाचली व घेण्यास नकार दिला. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती, खेड, जि.पुणे यांच्याकडील सुनावणीनंतर सर्व माहिती टपालाने पाठविली. त्यांचा मुलगा व पत्नी यांनीही तीच माहिती मागितली होती, तीच माहिती त्यांना देण्यात आली. अशा प्रकारे श्री.कड यांना वेळोवेळी माहिती दिली आहे. स्मशानभूमीचे बांधकाम हे अतिक्रमण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु ग्रामस्थांच्या अर्जानुसार व त्यांनी करुन दिलेल्या बक्षीसपत्रानुसार बांधकाम करण्यात आलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी बु.ता.खेड, जि.पुणे श्री.एस.बी.कड यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. अतिक्रमणाबाबत त्यांची तक्रार असल्यास उचित न्यायासनाकडे दाद मागण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे.

ग्रामपंचायतीचे विभाजन झाले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी बु., ता.खेड, जि.पुणे श्री.एस.बी.कड यांनी नमूद केले. संबंधित जागेबाबतचा विभाजनाआधीचा तपशील जन माहिती अधिकारी श्री.एस.बी.कड यांनी ३ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अपीलकर्ता म्हणत असलेल्या गटामध्ये खाजगी जमिनीबाबत अतिक्रमण झाल्याचा दाखला देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला नसल्याचे जन माहिती अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाकी बु.ता.खेड, जि.पुणे श्री.एस.बी.कड यांनी दि.११.०३.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
**दि.** 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,** महाराष्ट्र राज्य, **पुणे** खंडपीठ, **यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या** कलम १९ (३) **अन्वये दाखल झालेले** अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शिवकुमार काळुराम यादव
स.नं.१५३/अ, भोरीपडळ, हडपसर, पुणे-१३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
वानवडी विभाग कार्यालय, वानवडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५७/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २३.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त,<br>परिमंडळ-२, पुणे शहर, पुणे डॉ. जालिंदर सुपेकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>वानवडी विभाग कार्यालय, वानवडी, पुणे श्री. विठ्ठल टिकाराम पवार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.५.२००७ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अन्य व्यक्तीला दिलेल्या हातउसन्या पैशापोटी त्यांनी दिलेला चेक न वटता परत आला, त्या संदर्भात आपण केलेल्या फौजदारी दाव्यानंतर संबंधितांनी धमकी दिल्याबद्दल व आपल्या जिवाला धोका असल्याबद्दल केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. शिवकुमार काळुराम यादव यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, वानवडी विभाग, वानवडी यांच्याकडे मागितली होती. दिलेली माहिती दिशाभूल करणारी असून संबंधितांवर योग्य ती कारवाई केलेली नाही, अशी तक्रार श्री. यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

याच प्रकरणात श्री. यादव यांनी मागितलेली माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, वानवडी विभाग, वानवडी श्री. विठ्ठल टिकाराम पवार यांनी तोंडी व अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर, पुणे श्री. जालिंदर सुपेकर यांनी लेखी स्वरूपात पूरक कागदपत्रांसह केले. ते पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. कार्यवाही करणे वा तिची योग्य-योग्यता ठरविणे हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. श्रीकांत राचप्पा मोटगी
ई-५, सुरवसे नगर, कुमठा नाका,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
कॉमनवेल्थ बिल्डींग,
लक्ष्मी रोड, पुणे-३०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक,**
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय,
कॉमनवेल्थ बिल्डींग,
लक्ष्मी रोड, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५७/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०८/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/०२/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** १) अर्जदारास 'कच्चे दुध स्विकृती लिपीक' या पदाऐवजी 'दुग्धप्रेषक व बाटली तपासनीस' या पदाची जबाबदारी का दिली याबाबतचा खुलासा २) दुग्ध प्रेषक व बाटली तपासनीस म्हणून पार पाडलेल्या कामगिरीच्या आधारे वरिष्ठ वेतनश्रेणी अद्याप का मंजूर केली नाही, याबाबतचा खुलासा | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. श्रीकांत राचप्पा मोटगी हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्ता श्री. मोटगी यांना एकाच विषयाबाबत तीन - चार माहिती - मागणी अर्ज दाखल केले असून त्याबाबत त्यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. श्री.मोटगी यांची मूळ मागणी प्रशासकीय स्वरुपाची आहे' असे जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, श्री. मा. सि. माळगे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध व्यवसाय, अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केलेले आहे. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या दि.२५/०९/२००९ रोजीच्या निकालात याबाबतचा सविस्तर उहापोह करण्यात आलेला आहे, तो रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोतीराम गणपती पाटील
मु.टाळगाव, पो.उंडाळे, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत टाळगांव, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८३ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोतीराम गणपती पाटील
मु.टाळगाव, पो.उंडाळे, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.बी.आर.ढवळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.४.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दोन अर्जांद्वारे आपण विविध स्वरूपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाळगांव, ता.कराड, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. त्यांची माहिती एकत्रित व विलंबाने दिली. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, कराड, ता.कराड, जि.सातारा यांच्या आदेशानंतर ही माहिती देण्यात आली. एका अर्जातील माहिती ८४ दिवस विलंबाने व दुसऱ्या अर्जातील माहिती २०४ दिवस विलंबाने दिली. त्याबद्दल संबधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मोतीराम गणपती पाटील यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाळगांव, ता.कराड, जि.सातारा आजारपणामुळे रूग्णालयात दाखल असल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.डी.आर.ढवळे यांनी सांगितले. श्री.पाटील यांच्या अर्जातील माहितीची मागणी संदिग्ध स्वरूपात होती. त्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, टाळगांव, ता.कराड, जि.सातारा श्रीमती स्वाती अरूण माळी यांनी त्यांना विहित मुदतीत कळविले होते. अन्य अर्जाबाबत विहित मुदतीत शुल्क कळविले होते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.व्हि.बी.विभुते यांनी सांगितले.

अपीलकर्ता श्री.पाटील यांच्या अर्जामधील माहितीची मागणी संदिग्ध स्वरूपाची, तसेच 'जर तर'वर आधारित असे काही प्रश्न विचारणारी आहे. हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत टाळगांव, ता.कराड, जि.सातारा यांनी विहित मुदतीत पत्रव्यवहार केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याने मूळ अर्जानुसार काही माहिती मिळाली नसल्यास त्याबाबत नेमकेपणाने नमूद करून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत टाळगांव, ता.कराड, जि.सातारा यांना पत्र दिल्यास जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसात माहिती द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संतोष अंकुशराव शेलार
२७/५ निराळे वस्ती, गौरानगर,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स.),**
सोलापूर महानगरपालिका सोलापूर,

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
सोलापूर महानगरपालिका सोलापूर,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०४/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संतोष अंकुशराव शेलार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिका-यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने सदर कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत त्यांना आयोगाच्या दि.२१/०१/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळवले होते, तथापि त्यांनी अद्यापही आवश्यक कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संतोष अंकुशराव शेलार
२७/५, मुरारजी पेठ, निराळे वस्ती,
गौरानगर, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वनरक्षक,**
पुणे प्रादेशिक वन विभाग, स्वारगेट, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी(नियोजन),**
स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८/०८/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/०८/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०९/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वनरक्षक पदाच्या भरतीच्या संदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संतोष अंकुशराव शेलार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने सदर कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत त्यांना आयोगाच्या दि.२१/१/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते तथापि त्यांनी अद्यापही सदरची कागदपत्रे आयोगास सादर केलेली नाहीत.

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. संतोष अंकुशराव शेलार हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही दोन वेगवेगळया कार्यालयांतून संकलित करुन अपीलकर्त्यास देण्यात आलेली असल्याने माहिती देण्यास बावीस दिवसांचा विलंब झालेला आहे. तथापि अपीलकर्त्यास परिपूर्ण माहिती दिलेली आहे', असे सहाय्यक जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय, स्वारगेट, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. सं.ह.गावडे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. माहिती संकलित करुन देणे अथवा अर्ज संबंधितांकडे वर्ग करणे या प्रक्रियाही विहित मुदतीत पार पाडल्या पाहिजेत, याची समज जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी,पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वनरक्षक, पुणे यांना देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संजय महादेवराव सोनवणे
राजे संभाजी नगर (प.), तुळजापूर,
जि.उस्मानाबाद

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जेष्ठ लिपीक,**
साकत प्रशाला, साकत,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
साकत प्रशाला, साकत,
ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/०९/२००८, २३/०६/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/१०/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१)साकत प्रशालेमध्ये जानेवारी ते सप्टेंबर २००७ या कालावधीत किती माहिती अर्ज आले व किती जणांस उत्तरे दिली याबाबतची माहिती<br>२) प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक यांची नावे, नियुक्ती दिनांक, नियुक्ती मंजुरीच्या छायाप्रती, वेतन आणि मत्ता व दायित्व विवरण पत्र इ. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संजय महादेवराव सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा अधिक माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तरीही राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्याने मागणी केल्यानुसार दि.२२/१०/२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविलेली असून माहितीसाठीचे रु.६६/- एवढे शुल्क जमा करण्यात आले होते, तथापि प्रत्यक्षात रु.५४/- एवढा खर्च झाल्याने उर्वरित रक्कम रु.१२/- दि.२३/१०/२००८ रोजी अपीलकर्त्यास मनीऑर्डरने पाठविण्यात आली असून अपीलकर्त्याने सदर रक्कम स्वीकारलेली आहे', असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, साकत प्रशाला, साकत ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.मोहन बाबुराव घोरपडे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बी.जी. म्हाळसकर
शॉप नं.४, शांती बिल्डिंग,
वडगाव रेल्वे स्टेशनजवळ, वडगाव,
ता. मावळ, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.२.२०१० |

४ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बी.जी. म्हाळसकर
शॉप नं.४, शांती बिल्डिंग, वडगाव रेल्वे स्टेशनजवळ,
वडगाव, ता. मावळ, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे श्री. सुभाष भागडे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे श्रीमती शीतल मुळे-भामरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सरकारने प्रकल्पग्रस्त म्हणून दिलेल्या जमिनीला योग्य व्यक्तीच्या ऐवजी अन्य व्यक्तीची वारस नोंद केली, त्याबाबतची योग्य माहिती दिली नाही, ती द्यावी व मामलेदार ॲक्टप्रमाणे नोंद करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. बी. जी. म्हाळसकर यांनी केली.

संबंधित नोंद सन १९९५ मधील असून तत्कालीन मंडल अधिकारी यांनी कायद्यानुसार योग्य ते पुरावे घेऊन कार्यवाही केली आहे का, अशा स्वरुपाची विचारणा अपीलकर्त्यांनी केली आहे. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. आक्षेप असल्यास उपविभागीय अधिकारी, यांच्याकडे अपील ते करु शकतात. संबंधित संचिकेतील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या आहेत. 'नकला मिळाल्या असून अर्ज निकाली काढावा, काही तक्रार नाही,' असे अपीलकर्त्यांनी दि. २९.८.२००७ रोजी लेखी दिले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, राजगुरुनगर श्रीमती शीतल मुळे-भामरे यांनी संबंधित पत्राच्या छायांकित प्रतीसह केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. वारस नोंदप्रकरणी केलेली कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर, याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजय बलभीम पवार
घर नं.१२५, दक्षिण सदर बझार,
श्रीराम मंदिरासमोर सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
महिला पोलीस प्रशिक्षण विद्यालय,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य,**
महिला पोलीस प्रशिक्षण विद्यालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/११/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/१२/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पोलिस कॉन्सटेबल श्री. झे.आर.कोरेशेट्टी यांची नियुक्ती, तसेच अर्जदाराच्या दि.१९/०५/२०६ रोजीच्या अर्जावरील कार्यवाही इ. संदर्भातील एकूण ४ मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. विजय बलभीम पवार हे अनुपस्थित होते त्यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती विहित वेळेत देऊनसुध्दा अपीलकर्ता श्री. पवार अर्ज करत आहेत व त्याच मुद्दयावर अर्ज केला आहे असे जन माहिती अधिकारी

तथा उप प्राचार्य, महिला पोलीस प्रशिक्षण विद्यालय, श्री.एच.एच.पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विलास सदानंद खमितकर
६१२ अ, शुक्रवार पेठ, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा,**
**१)** सहायक आयुक्त (स.),
२) सहायक आयुक्त (वि.),
३) विशेष कार्यकारी अधिकारी,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/११/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १/१२/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. प्रकाश शंकरराव घाटे यांच्या मालकीच्या घर नं. ५५२/ब, (सि.स.नं. ४३/४४) च्या जुन्या व नव्या नकाशाची नक्कल | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विलास सदानंद खमितकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केले आहे. 'अपीलकर्त्याने माहिती - मागणी अर्जात नमूद केलेल्या ठिकाणचे एकापेक्षा जास्त नकाशे असल्याने त्यापैकी अपीलकर्त्यास कोणता नकाशा हवा

आहे, याबाबत बांधकाम परवानगी कार्यालयात समक्ष येऊन, नकाशांची धारिका पाहून, त्यांना आवश्यक असणारा नकाशा दाखविल्यास योग्य ती फी भरुन त्याची नक्कल तयार करुन देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत दि.१८/११/२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार अपीलकर्त्याने आवश्यकतर शुल्क भरुन नकाशाची नक्कल प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. हरी आप्पा प्रक्षाळे
अनिलनगर, मसोबा मंदिरासमोर,
मु.पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक,**
उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०९/२००८, ३०/०९/२००८ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयास सन २००६ - २००७ व २००७-२००८ या वर्षासाठी डॉ.आंनदीबाई जोशी पुरस्काराची मिळालेली रक्कम व केलेल्या खर्चाचा तपशील आणि पावत्या, तसेच रुग्णालयाने विकलेले भंगार, लेखाशिर्षनिहाय केलेला खर्च व धर्मशाळेतून दरमहा मिळणारे भाडे इ. बाबतची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. हरी आप्पा प्रक्षाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, माहिती असमाधानकारक व अपूर्ण असल्याचे अपीलकर्त्यानी राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२७/०२/२००९ रोजीच्या

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' च्या प्रपत्रात म्हटले आहे. तथापि सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता त्यांना उपलब्ध माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरावरुन दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महंमद अब्दुल शेख
आशिष मंजिल, सरस्वतीनगर, मु.पो.ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी(आस्था),
महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,
महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महंमद अब्दुल शेख
आशिष मंजिल, सरस्वतीनगर, मु.पो.ता.इंदापूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ,
१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई प्रतिनिधी श्री.व्ही.व्ही.जाधव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.१०.२००७ व २७.११.२००७ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ व २७.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी सर्व संबंधित गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष व मंत्री यांनी दिलेल्या स्थगिती आदेशाची प्रत व अन्य माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई यांनी दिली नाही व त्यानुसार योग्य ती कार्यवाहीही केली नाही. आपल्या दोन अर्जांबाबत एका अर्जाचे उत्तर ५३ दिवसांनी व दुसऱ्या अर्जाचे उत्तर ७२ दिवसांनी दिले. त्याबद्दल संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महंमद अब्दुल शेख यांनी केली.

श्री.शेख हे पूर्वी मंडळात सचिव पदावर कार्यरत होते. त्यांचा अर्ज दि.३०.७.२००७ रोजी प्राप्त झाला. संबंधित विभागाकडे तो पाठवून प्राप्त झालेली माहिती दि.५.९.२००७ रोजी पाठविली. त्यानंतर त्यांनी दुसरा अर्ज दि.१८.९.२००७ रोजी केला व आधीच्या अर्जावर दिलेली माहिती अपूर्ण असल्याबाबत नमूद करून काही मुद्दयांबाबत खुलाशाची मागणी केली. त्यानुसार तपासणी करून संबंधित विभागाकडे पुन्हा कळविले. त्या विभागाकडून दि.२६.११.२००७ रोजी प्राप्त झालेली माहिती दि.२७.११.२००७ च्या पत्राने श्री.शेख यांना पाठविली. ही कार्यवाही करणारे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई श्री.व्ही.एन.तायडे व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(आस्था), महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई श्री.प्रीतम आठवले हे दोघेही निवृत्त झालेले आहेत. श्री.शेख यांनी मागितलेली स्थगिती आदेशाची प्रत शोध घेऊनही अभिलेखात आढळत नाही. अन्य मुद्दयांमध्ये त्यांनी खुलाशाची व कारणांची विचारणा केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती 'माहिती' ठरत नाही.

तरीही त्यांच्या विविध अर्जांना वेळोवेळी उत्तरे देण्यात आली आहेत, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.व्ही.जाधव यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.शेख यांनी मूळ अर्जातील माहितीतील अपूर्णतेबाबत पुन्हा माहिती मागणीचा अर्ज केला आहे. त्यांच्या अर्जातील बहुसंख्य मुद्दे खुलासा, स्पष्टीकरण अथवा भाष्य मागणारे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत अशी विचारणा येत नाही. स्थगिती आदेशाची प्रत व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही याची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. संबंधित संचिका अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२५.५.२०१० पर्यंत जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजाराम बाबुराव सावंत
मु.पो.वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ
तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे
विद्यमान-श्री.राजेश चव्हाण, तत्कालीन श्री.किशोर घाडगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.७.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.८.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी घेण्यात आली.

तहसीलदारांपुढे झालेल्या सन १९९४ ते १९९६ या काळातील एका प्रकरणामधील कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडे मागितल्या होत्या. परंतु त्यांनी काहीही कळविले नाही, असे अपीलकर्ता श्री.राजाराम बाबुराव सावंत यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

अपीलकर्त्यास मुदतीत माहिती दिल्याने अर्ज निकाली काढावा, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे श्री.चंद्रकांत जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात म्हटले आहे. मात्र संबंधित प्रकरण सन १९९५ मधील असून रजिस्टरला त्यची नोंद नाही, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यांनी नमूद केले.

अभिलेखाच्या वर्गवारीनुसार संबंधित प्रकरणातील कागदपत्रांचा जतनाचा कालावधी किती आहे, हे तपासून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे यांनी अभिलेखाचा शोध घ्यावा व अपीलकर्त्यास माहिती द्यावी

संबंधित संचिकेचे  अवलोकन अपीलकर्त्याला नि:शुल्क करू द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे यांनी दि.५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) माहिती दिलेली नसताना दिल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ तहसील कार्यालय, ता.मावळ, जि.पुणे श्री.किशोर घाडगे यांनी प्रपत्रात नमूद करणे आक्षेपार्ह व आयोगाची दिशाभूल करणारे आहे. त्याबद्दल त्यांना शास्ती का करू नये, याचा लेखी खुलासा त्यानी दि.१०.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२०१०